प्रेसनोट दिनांक:– १७/०१/२०२३

आरोपी लोकसेवक यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करून, ती स्विकारल्याने अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने त्याना ताब्यात घेतलेबाबत.

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोद क्रमांक | :– | ——— |
| आरोपी लोकसेवकाचे/खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | :– | श्री. रविंद्र केशवराव जाधव, वय ४७ वर्षे, पद अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (वर्ग–१), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित वाशी उपविभाग, वाशी, नवी मुंबई |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | २०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | स्विकारलेली १५,०००/–रु. |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार हे काम करीत असलेल्या कंपनीच्या मिटर रिडीग, बिल प्रिंटींग व बिल वितरणाचे कामाच्या थकीत देयकांस ''समाधानकारक'' असा शेरा मारून, ती कार्यकारी अभियंता कार्यालयास मंजूरीसाठी पाठविणेकरीता आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडून २०,०००/– रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १६/०१/२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे या कार्यालयास लेखी तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने पंच साक्षीदारांसमक्ष दिनांक १७/०१/२०२३ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईत वर नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे स्वत:करीता २०,०००/–रु. लाचेची मागणी करून ती तडजोडीअंती १५,०००/– रुपयेची स्विकारण्याचे मान्य केल्याने, आज दिनांक १७/०१/२०२३ रोजी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन त्यांचेविरुध्द पंच साक्षीदारा समक्ष आजमाविण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक श्री. जाधव यांनी तक्रारदार यांचेकडून १५,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारली असताना त्यांना १७:५० वाजता रंगेहाथ पकडण्यात आले. |

मार्गदर्शन अधिकारी–मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परीक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

सपंर्क पत्ता–लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ–acbmaharastra@mahapolice.gov.in
Email - spacbthane@mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन–acbmaharashtra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअॅप्स् क्रमांक– ९९३०९९७७००.
दिनांक :– १७/०१/२०२३

(पल्लवी ढगे–पाटील)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

Scanned with OKEN Scanner